लोकमत दि 03/03/2023

# 'एडीजी' म्हणाले, नांदेड एसपी 'बॅलन्सिंग लीडर'




राज्याचे अप्पर पोलिस महासंचालक रवींद्र सिंघल यांनी नांदेडचे जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचा बॅलन्सिंग लीडर अशा शब्दात गौरव केला. एकेकाळी रवींद्र सिंघल नांदेडला पोलिस अधीक्षक होते. त्यावेळी त्यांनी घेतलेली पोलिस भरती पारदर्शक कारभारामुळे आजही तरुणांच्या स्मरणात आहे. या भरतीत सिलेक्ट झालेलेच नव्हे तर रिजेक्ट झालेले तरुणसुद्धा सिंघल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वसरणी भागात रक्तदान शिबिर घेतात. बुधवारी त्यांनी वाचनालयाचे उद्घाटन ठेवले होते. त्यासाठी अप्पर पोलिस महासंचालक रवींद्र सिंघल खास नांदेडला आले होते. यावेळी त्यांनी नांदेडचे एसपी श्रीकृष्ण कोकाटे यांच्या कामकाजाच्या पद्धतीचे तोंडभरून कौतुक केले. ते चांगले व बॅलन्सिंग लीडर असल्याचे सिंघल यांनी सांगितले. यापूर्वी सिंघल नाशिकला पोलिस आयुक्त असताना कोकाटे त्यांच्या अधिनस्थ उपायुक्त म्हणून कार्यरत होते. त्या अनुभवावरून सिंघल यांनी कोकाटे यांना उत्कृष्ट व समतोल लीडरचा दाखला दिला. सिंघल यांनी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यातही भेट दिली. यावेळी चोरी गेलेले व पोलिसांनी परिश्रमपूर्वक तपास करून जप्त केलेले दागिने संबंधित मालकाला सिंघल यांच्या हस्ते सोपविले गेले. सिंघल यांनी यावेळी नांदेड ग्रामीण पोलिसांनी उघडकीस आणलेल्या वाटमारीच्या १४ गुन्ह्यांचे कौतुक करताना हे काम सोपे नाही, असेही सांगितले.